वर्ष ४३ अंक ६

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

BMM
|| मराठी तितुका मेळवावा ||

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक    जून २०२३

## अध्यक्षीय

नमस्कार मित्र-मैत्रिणींनो,
सर्वप्रथम आपण बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या काही निवडक प्रकल्पांचे त्यांच्या मे महिन्यातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभिनंदन करुयात. मे च्या पहिल्या आठवड्यात बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कम्युनिटी आउटरिच क्रिकेट समितीने प्रसाद पानवलकर याच्या नेतृत्वाखाली टेक्सास प्रादेशिक क्रिकेट स्पर्धा ह्युस्टन येथे आयोजित केली. या स्पर्धेत एकूण आठ संघांनी भाग घेतला. त्यातील दोन महिलांच्या टीम्स होत्या. ह्युस्टन,आस्टीन व सॅन अँटोनियो या गावातून १५० खेळाडू या स्पर्धेसाठी आले होते.



कम्युनिटी आउटरिच क्रिकेट समितीचे, तसेच तीन मंडळातील एकूण आठ संघातील सर्व खेळाडूंचे व विजेत्या ऑस्टीन महिला संघाचे हार्दिक अभिनंदन! पावसामुळे पुढे गेलेल्या पुरुषांच्या विजेतेपदाचा सामना आता ऑगस्ट महिन्यात होणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील विजेतेपद स्पर्धा आपण पुढील वर्षी अधिवेशनाच्या वेळेस घेणार आहोत.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शाळा समितीने सविता मोरे यांच्या नेतृत्वाखाली रेकॉर्ड-ब्रेकिंग १२९८ विद्यार्थ्यांची परीक्षा यशस्वीरित्या मे मध्ये आयोजित केली. शाळा समितीचे तसेच सर्व मंडळातील शाळा समन्वयक, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

अत्यंत अल्पावधीत हा अंक प्रसिद्ध केल्याबद्दल बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वृत्त संपादकीय समितीचे व यशस्वी नेतृत्वाबद्दल राजन पेडणेकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

जून १५ ते ऑगस्ट १५ च्या दरम्यान होणाऱ्या बृहन महाराष्ट्र मंडळ युवा इंटर्नशिपची आखणी जोरात चालू आहे. बीएमएम रेशीमगाठी सॉफ्टवेअर मध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात आलेली आहे. उत्तररंग, मेडिटेशन, फिलॉसॉफी, आऊट-डुअर्स, महिला सबलीकरण, वारसा, बी-कनेक्ट असे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या बीएमएम २.० संकल्पनेवर आधारित वीसाहून अधिक उपक्रम शंभराहून अधिक कार्यकर्ते जोमाने चालवत आहेत. या आपल्या सर्व समित्यांचे व कार्यकर्त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. या सगळ्या प्रकल्पांत नाव नोंदणीची सुविधा, वृत्त व इतर प्रकाशन, तसेच बीएमएमच्या येत्या आठवड्यातील सत्रांची माहिती bmmapp.org मध्ये उपलब्ध आहे. या ॲपची माहिती तुम्ही तुमच्या मित्र-मैत्रिणींपर्यंत नक्की पोहोचवा.

नेहमीप्रमाणे सांख्य-कारिकेच्या एका श्लोकाने थांबतो.

स्वालक्षण्यं वृत्ती स्त्रयस्य सैषा भवती असामान्या ।
सामान्यकरण वृत्ती: प्राणाद्या वायव: पंच ॥

तीन अंतर्गत उपकरणातील (बुद्धी, अहंकार व मन) प्रत्येकाचे कार्य (निर्णय घेण्याची/भेदभाव करण्याची क्षमता, मी आहे ही जाणीव, आणि विचार व अनुभवांची साठवण) निराळे आहे. पाच वायू (प्राण, अपान, समान, उदान, व्यान) या तीनही उपकरणांसाठी सामान्य (common) आहेत.

शुभेच्छा,

संदीप दीक्षित
अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२२-२४ /
President, Bruhan Maharashtra Mandal of North America (BMM) 2022-24
+1 216-926-6696
sandeep.dixit@bmmonline.org
twitter.com/bmmpresident
www.bmmonline.org
https://bmm2.page.link/bmmapp
#bmm2 #communityCentricBMM #mandalMember #vruttaSubscriber

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
संस्थापक:- कै . विष्णु वैद्य, कै . शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
इमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
BMM Treasurer - Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330
Email: Rajan.Pednekar@bmmonline.org

**वर्गणीचे दर**:- $25/ year
Subscription payment is accepted online by Paypal:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription
**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिद्ध होते. आदल्या महिन्याच्या २० तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२ - २०२४)**
**मताधिकार असलेले सदस्य**
अध्यक्ष: संदीप दीक्षित क्लिव्हलँड, ओहायो
सचिव: अजित नातू सॅक्रामेंटो, कॅलिफोर्निया
कोषाध्यक्ष: राजन पेडणेकर टॅम्पा बे, फ्लोरिडा
सदस्य: अमर उन्हेकर, लिविंगस्टन, न्यु जर्सी
सविता मोरे वॉशिंग्टन
मंजुषा नाईक वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रसाद पानवळकर ऑस्टिन, टेक्सस
विराज राऊत सॅन होजे, कॅलिफोर्निया
**नियुक्त सदस्य**
माजी अध्यक्ष: विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय
**विश्वस्त समिती**
अध्यक्ष : मोहित चिटणीस, सिऍटल, वॉशिंग्टन
सदस्य: नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

# या अंकात

| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक मंडळ | २ |
| बृ. म. मंडळाचा प्रादेशिक मैत्री मेळावा २०२३ वार्ता | ३ |
| बृ. म. मंडळ अधिवेशन, बे एरिया – २०२४ वार्ता | ४ |
| बृ. म. मंडळ उपक्रम | ५ |
| लेख: मोगरा फुलला | ६ |
| लेख: या देवी सर्व भूतेषु | ७ |
| ओळख: एकलव्य फाउंडेशन | ९ |
| टेक्सस प्रादेशिक क्रिकेट स्पर्धा | १० |
| जाहिरात | ११ |

# संपादक मंडळ

वृत्त संपादनाची धुरा या अंकापासून नवीन संपादक मंडळाने हाती घेतली आहे. गेली अनेक वर्षे सातत्याने काम करणाऱ्या संपादकांचे आभार. नवीन संपादक मंडळाची घडी बसेपर्यंत वृत्तच्या अंकात काही बदल दिसतील. तुमच्या सूचना इमेलद्वारे जरूर कळवा.

**संपादक मंडळातील सदस्य**


अपर्णा कोळेकर


कोमल कुलकर्णी


नीता धोपेश्वरकर


शुभदा सावरगावकर


विदुला कोल्हटकर


राजन पेडणेकर (EC Lead)

अनिता कांत, शीतल रांगणेकर

# बृहन्महाराष्ट्र मंडळाचा 'प्रादेशिक मराठी मैत्री मेळावा'

### मराठी कला मंडळ, ग्रेटर वॉशिंग्टन डी सी

मराठी कला मंडळ (MKM), वॉशिंग्टन डीसी आयोजित करत आहे बृहन्महाराष्ट्र मंडळ मैत्री मेळावा. जुलै १५ २०२३ रोजी आयोजित केल्या जाणाऱ्या ह्या बृहन्महाराष्ट्र मंडळ मैत्री मेळाव्यात तुम्हा सर्वांचे सहर्ष स्वागत आहे. The name says it all. DMV परिसराच्या आजूबाजूला असलेल्या इतर मंडळांशी स्नेहाचे संबंध वाढावेत म्हणून हा मेळावा आम्ही आयोजित केला आहे. बाल्टिमोर मराठी मंडळ (बीएमएम), ग्रेटर रिचमंड मराठी मंडळ (जीआरएमएम) आणि सेंट्रल पेन मराठी मंडळ (सीपीएमएम) या कार्यक्रमात सामील होणार आहेत.

BMM 2.0 चे सर्व उपक्रम/प्रवाह ह्या भागातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा मानस आहे. जे विविध BMM प्रवाहांचे सक्रिय सदस्य आहेत, त्यांच्यासाठी मैत्री मिळावा हा कार्यक्रम त्यांच्या इतर सदस्यांना प्रत्यक्ष भेटण्याची एक संधी असेल. आमच्यापैकी काहींना यापूर्वी कोणत्याही बीएमएम अधिवेशनांना उपस्थित राहता आले नव्हते. मैत्री मेळाव्याच्या निमित्ताने आम्हाला आमच्या भागातील बीएमएम उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळेल.

या मेळाव्याचं वैशिष्ट्य असणार आहे भारतातून आलेला कार्यक्रम “महाराष्ट्राची हास्य जत्रा”. चला तर मग भेटूया १५ जुलै २०२३ रोजी!

https://www.marathi.com/mkm-maitri-melawa/

अधिक माहितीसाठी किंवा तुमच्या प्रश्नांसाठी कृपया ईमेल करा maitrimelawa@marathi.com.




### सिॲटल् महाराष्ट्र मंडळ

यंदाच्या जुलै महिन्यात सिॲटल् महाराष्ट्र मंडळ BMM मैत्री मेळावा आयोजित करत आहे. सिॲटल् महाराष्ट्र मंडळ अजून दोन मंडळांबरोबर मिळून हा सोहळा साजरा करणार आहे. ही दोन बंधू मंडळे आहेत - Portland , Oregon येथील ओरेगॉन महाराष्ट्र मंडळ आणि Marathi Society of British Columbia हे Vancouver, Canada मधील मंडळ.

मैत्री मेळाव्याची संकल्पना असणार आहे - वारसा जपू संस्कृतीचा, बंध जोडू मैत्रीचा! आपल्या संस्कृतीचं जतन करताना मैत्रीचेही बंध घट्ट जोडूया. आपल्या स्थानिक कलाकारांना कलागुण दाखवण्याची संधी देणे, त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे ही ह्या मैत्री मेळाव्याचे एक उद्दिष्ट आहे. मैत्री मेळाव्याच्या पहिल्या दिवशी असतील तीन मंडळांचे दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम. ह्यात असेल नाटक, संगीत, वादन, नृत्य आणि बरंच काही. मेळाव्याचा दुसरा दिवस असेल गाठीभेटींचा. मराठी उद्योजकांच्या गाठीभेटी, युवा संमेलन, ज्येष्ठ नागरिकांच्या गप्पाटप्पा, karaoke असे विविध कार्यक्रम असतील.

मंडळाची मेळाव्यासाठी जोरदार तयारी सुरु आहे. तर ह्या मेळाव्यात सामील होण्यासाठी सिॲटल् महाराष्ट्र मंडळ नॉर्थ अमेरिका भागातील सर्व मराठी मंडळांना सस्नेह आमंत्रण देत आहे.

आनंदाचा प्रत्यय यावा, तुमचा आमचा सूर जुळावा
संस्कृतीचा सुंदर देखावा, मौजमजेचा अक्षय ठेवा
सुंदर क्षणांचा असेल पुरावा, BMM मैत्री मेळावा

https://www.seattlemm.org/events/bmm-प्रादेशिक-मराठी-मैत्री-म




- राशिभविष्य:- जून २०२३
दादा दामले (न्यू जर्सी )
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

# बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, बे एरिया २०२४ – वार्ता

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २०२४ सालच्या अधिवेशनाची घोषवाक्य स्पर्धा:**

सन २०२४ मध्ये सॅन होजे येथे भरणाऱ्या अधिवेशनाचा विषय सिलिकॉन व्हॅली, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि मराठी संस्कृती असा आहे. स्पर्धकांनी या विषयाला अनुरूप असे घोषवाक्य आयोजकांना पाठवावे अशी नम्र विनंती आहे.

**स्पर्धेच्या अटी:**

- घोषवाक्य मराठीत असावे, त्याचबरोवर मराठी संस्कृती आणि समाजाचे दर्शन घडविणारे असावे.
- घोषवाक्य बृ. म. मं. २०२४ च्या लोगोला अनुरूप असावे; सिलिकॉन व्हॅली आणि आधुनिक मराठी भाषेशी जुळणारे असावे.
- घोषवाक्य अभिनव असावे. कुठल्याही विद्यमान कलाकृतीच्या कॉपी राईट्स किंवा ट्रेडमार्कचे उल्लंघन होणार नाही याची स्पर्धकांनी काळजी घ्यावी.
- परीक्षकांचा निर्णय सर्जनशीलता, कल्पकता आणि अधिवेशनाच्या विषयाशी अनुरूपता या निकषांवर आधारित असेल.
- परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.
- घोषवाक्य ८ शब्दांपर्यंत मर्यादित ठेवावे.
- एक स्पर्धक फक्त एकच एंट्री/ प्रवेश पाठवू शकतो.
- ५ जून २०२३, रात्री १२:०० वाजेपर्यंत स्पर्धकांची घोषवाक्ये स्वीकारली जातील.

घोषवाक्य आणि त्यासंबंधित सर्व प्रश्नांसाठी संपर्क करा: programming@bmm2024.org
Entry form: https://forms.gle/N2LZV6AkirNvRcu6A

**कार्यकर्त्यांची सभा**:
एप्रिलच्या २९ तारखेला बृ. म. मं. २०२४ च्या सर्व कार्यकर्त्यांची बैठक सनीव्हेल येथे घेण्यात आली. या सभेत १६० हून अधिक उत्साही कार्यकर्ते उपस्थित होते. अधिवेशनाचे आयोजक श्री. प्रकाश भालेराव यांनी आत्तापर्यंत झालेल्या कामाचा आढावा घेतला आणि विविध प्रश्नांची उत्तरे दिली. प्रत्येक चमूने आपल्या सभासदांची ओळख करून दिली तसेच, येत्या कार्यकाळातील महत्त्वांच्या टप्प्यांविषयी तपशीलवार माहिती दिली.






http://www.bmmapp.org/

bmm2.page.link/meditation

http://bmm2.page.link/uttarrang

## तत्वज्ञान उपक्रम

भारतीय तत्वज्ञान

बृहन्महाराष्ट्र-तत्वज्ञान ह्या उपक्रमाचा शुभारंभ १२ जानेवारी २०२३ रोजी झाला. आतापर्यंत ह्या उपक्रमात तीन व्याख्यान मालिका झाल्या आहेत/ सुरु आहेत. मालिकेचा शुभारंभ सद्गुरू परम पूज्य डॉ. काकांचे कृपांकित शिष्य, पूज्य श्री मंगेशदादा फडके, जे आता स्वतः सद्गुरू पदावर आहेत ह्याच्या हस्ते झाला. आपल्या परम भाग्याने पूज्य मंगेशदादा आपल्याला दोन मालिकेसाठी वक्ते म्हणून लाभले आहेत.

**महाभाग्यवान स्वामी विवेकानंद**
**वक्ते** : परम पूज्य श्री मंगेश दादा फडके
१२ जानेवारी ते ५ फेब्रुवारी २०२३
ही मालिका नावाप्रमाणे स्वामी विवेकानंदांवर आधारित होती. मालिकेमधून नरेंद्र ते स्वामी विवेकानंद हा प्रवास समजून घेतला.

**आनंदाचे तत्वज्ञान**
**वक्ते** : परम पूज्य श्री मंगेश दादा फडके
१२ फेब्रुवारीपासून
ही मालिका भारतीय तत्वज्ञानावर आधारित असून ह्याचे एकूण ढोबळमानाने ३ विभाग आहेत.
पहिला विभाग: तत्वज्ञान आपल्या आयुष्यात का असावं? असलं तर आपण काय कमावतो आणि नसलं तर आपण काय गमावतो? (Why it is important?)
दुसरा विभाग: तत्वज्ञान म्हणजे नक्की काय?(What it means?)
तिसरा विभाग: तत्वज्ञान आपण आपल्या आयुष्यात कसे सामावून घ्यायचे? (How to do it?)

२३ एप्रिल २०२३ ला ह्या मालिकेचे दोन विभाग पूर्ण झाले. तिसरा विभाग २८ मे पासून सुरु होईल.

**विवेके शोधिले पाहिजे**
**वक्ते**: श्री निलेश ओक .
३० एप्रिल ते २१ मे २०२३
तत्त्वज्ञानाचा जेव्हा जेव्हा विचार होतो तेव्हा विवेक किती महत्त्वाचा आहे हे नेहमी ध्यानात येत. तेव्हा हाच धागा धरून ही मालिका सुरु झाली. आपल्याला अतिशय अभ्यासु, स्वतःची उत्तम साधना असणारे आणि प्रगल्भ बुद्धिमत्ता असलेले व्यक्तिमत्त्व श्री निलेशजी ओक यांच्या रूपाने लाभले आहेत. ते ह्या मालिकेद्वारे नीरक्षीर विवेक वापरून आपल्या धर्म ग्रंथांचा अभ्यास कसा करायचा हे उधृत करून सांगत आहेत. मालिका खालील दोन ओव्यांवर आधारित आहे.

वेद पुराणे शास्त्रे श्रुती । उपनिषिद गीता भागवती ।
न्याय मीमांसा तर्क निश्चिती । विवेके शोधिले पाहिजे ।।१२१।।
वरीवरी ग्रंथ पाहता । नकळे त्यातील गूढार्थ ।
स्थीर चित्ते विपरिता । अर्थ तेव्हा तो कळे ।।१२२।।

श्री सीताराम महाराज (टेंबे) यांचे ओवीबद्ध चरित्र , रचियता : सद्गुरू परम पूज्य श्री. नारायण महाराज

## वारसा उपक्रम

आजचा उत्तर अमेरिकेतील मराठी समाज कोण आहे हे समजून घ्यायचे असेल तर आपण कुठून आलो, का आलो, आणि इथल्या मातीत आपली मूळ रोवून कसे भरभराटीला आलो हे शोधलं पाहिजे, त्याची नोंद करून, ते जतन केलं पाहिजे. अश्या गोष्टी एकत्रित केल्या कि सर्वांना आणि भावी पिढीला आपल्या प्रवासाची झलक मिळेल. त्यासाठी चालू केला आहे "वारसा" हा प्रकल्प.



**वारसा मालिका, भाग सहावा**
"शिवाजी पार्क दादर ते युनायटेड नेशन न्युयॉर्क"
श्री. प्रकाश रणदिवे, अमेरिकेत स्थलांतर १९५८

प्रकाश रणदिवे मूळचे दादरचे, शिवाजी पार्कला राहणारे. शाळा, किंग जॉर्ज हायस्कूल. कॉलेज, रुपारेल. दादर जिमखान्याचे क्रिकेट, अत्रे फडके अशा मातबगार वक्त्यांची भाषणं, प्रसिद्ध नाटकं अशा मराठी संस्कृतीच्या गंगेकाठी राहत असूनही वयाच्या अवघ्या 18 व्या वर्षी undergrad शिक्षणासाठी अमेरिकेत जायचा त्यांनी निर्णय घेतला. NYU मधून "बॅचलर in इंजीनीरिंग" तर कोलंबिया युनिव्हर्सिटीमधून "मास्टर्स इन ऑपरेशन रिसर्च" या पदव्या मिळवल्या. शिक्षणासाठी पैसे मिळावे म्हणून ते United Nations मध्ये सर्वांत खालच्या पदावर नोकरीला लागले. तिथे प्रचंड व्यावसायिक यश मिळवले. जानेवरी १९८८ मध्ये सेक्रेटरी जनरल Pérez de Cuéllar यांनी श्री प्रकाश रणदिवे यांना "एक्झिक्युटिव्ह सेक्रेटरी ऑफ युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल सिव्हिल सर्व्हिस कमिशन" ही सर्वात उच्च पदवी देऊन सन्मानित केले ती जबाबदारी प्रकाश यांनी अतिशय उत्तमरीत्या १२ वर्ष सांभाळली आणि 2000 मध्ये ते UNO युनो मधुन निवृत्त झाले. अश्या एका किशोर वयात अमेरिकेत येऊन आपल्या कर्तृत्वाने केलेल्या त्यांच्या ह्या आनंदी प्रवासाची कहाणी त्यांच्याकडूनच ऐकू या, ह्या आपल्या सहाव्या सत्रात. "शिवाजी पार्क दादर ते युनायटेड नेशन न्युयॉर्क".

वारसा मालिकेचा हा अनोखा भाग (#६) " शिवाजी पार्क दादर ते युनायटेड नेशन न्युयॉर्क " पहाण्यासाठी खालील क्लिक (link) करा किंवा तुमच्या mobile phone वरून इथे दिलेला QR code scan करा. ह्या Youtube channel ला जरूर like आणि subscribe करा.
Episode 6.0 - शिवाजी पार्क दादर ते युनायटेड नेशन न्युयॉर्क
मागील भाग: https://www.youtube.com/@bmm-varasa

# मोगरा फुलला

इथे अमेरिकेत परवा एका गाण्याच्या कार्यक्रमाला गेलो होतो. खुर्चीत बसता बसता कुठूनसा मोगऱ्याचा चिरपरिचित गंध आला. हा 'अवचित परिमळु' कुठूनसा आला म्हणून आजूबाजूला पाहिलं तर शेजारच्या खुर्चीतल्या काकू मस्त मोगऱ्याचा गजरा माळून आल्या होत्या. मागे लक्ष गेलं तर त्यांच्या बरोबर मागच्या खुर्चीत एक फुलवेडी मैत्रीण मोगऱ्याचे फुल हुंगत बसली होती. "कुठे मिळालं?" मी खुणेनेच विचारले. तिने हसत काकूंच्या गजऱ्याकडे बघत डोळे मिचकावले आणि त्या गजऱ्याकडे बोट दाखवीत खुणेनेच म्हणाली 'इथून'! आता कार्यक्रमात मोगऱ्याचा सुगंध सोबत असणार ह्या जाणिवेने मन सुखावले आणि माझ्या नकळत तो गंध मला थेट मुंबईतल्या, जिथे मी लहानाची मोठी झाले त्या शहरातल्या नाट्यगृहात घेऊन गेला. नाटकाला जाताना गजरा माळून जाण्याचा प्रघात असावा, तशा काही गजरा धारिणी नाट्यगृहात दिसायच्या! एकदा तर मी ऑफिसमध्ये गजरा माळून गेले तर सहकाऱ्याने विचारले होते "काय! आज ऑफिस नंतर नाटकाचा प्लॅन वाटतं?" इतकं नाटक आणि गजरा यांचं समीकरण जुळलेलं! काहीही असो पण हे गजरे नाट्यगृहातले वातावरण अगदी आल्हाददायक करायचे, हे नक्की!

लहानपणी पाहिलेले ते वैशाखातील लग्नसोहळे आठवतात. आमच्या लहानपणी वातानुकूलित लग्नाचे हॉल प्रचलित नव्हते. लग्नाच्या हॉलमध्ये मोठे मोठे पंखे आणि कूलर लावलेले असायचे. माणसांनी फुलून गेलेल्या त्या हॉलमध्ये वैशाखातील प्रचंड उकाडा आणि त्यावर मात करायचा निष्फळ प्रयत्न करणारे ते पंखे आणि कूलर यांच्यात चढाओढ लागली असं वाटे. त्यातून तयार होणारे थंड-गरम हवेचे अजब मिश्रण सर्व हॉलमध्ये पसरलेले असे. या मिश्र हवेत अजून एक सुगंध मिसळलेला असायचा तो मोगऱ्याचा! नवऱ्यामुलीपासून वऱ्हाडी महिला मंडळ पर्यंत समस्त महिला मंडळाचे अंबाडे, वेण्या मोगऱ्याच्या गजऱ्यानी सुशोभीत झालेले असायचे. घामाच्या धारा पुसत इकडे तिकडे वावरताना, मानेला, खांद्याला होणारा तो मोगऱ्याचा थंड स्पर्श आणि नाकाजवळ हुळहुळणारा मंद गंध त्या उष्म्यातही मस्तकात गारवा पोहोचवायचे. अशीच आणखी एक आठवण म्हणजे शाळेचं गॅदरिंग! तिथेही अशीच लगीन घाई असायची आणि आठवतात ते त्या तशा धांदलीतही मन प्रसन्न ठेवणारे मोगऱ्याचे गजरे! कुठंतरी वाचल्याचं आठवतंय 'मोगऱ्याचा गंध ताण-तणाव दूर करतो.'

त्या काळातल्या रेखा, जयाप्रदा सारख्या नट्या पडद्यावर सोज्वळ, सुशील गृहिणी साकारताना डोईजड होतील इतके भरगच्च गजरे वेणीत खोवायच्या. काय लोभसवाण्या दिसायच्या त्या!! माझ्या आईची एक मैत्रीण होती, तिला आम्ही शकुनमावशी म्हणायचो. ती कधी कधी काकांबरोबर आम्हाला भेटायला यायची आणि येताना आम्हा मुलांसाठी खाऊ घेऊन यायची. ती आली कि मी खूप खुश असायचे, खाऊसाठी नाहीं तर एका वेगळ्याच कारणासाठी! ही आमची हसरी शकुन मावशी नेहमी मोगऱ्याचा गजरा माळायची. ती घरात आली, की घरात मोगऱ्याचा सुखद दरवळ पसरायचा. तिच्या रूपात चैतन्यच प्रवेश करायचं घरात! फार प्रेमळ होती ती. सगळ्यांची आस्थेने चौकशी करायची. तिच्या त्या वात्सल्यरूपाला मोगऱ्याच्या परिमळाची जोड मिळायची आणि मला ती अधिकच आवडायची. मी तिच्या अवतीभवती घुटमळत रहायचे. तिच्यामुळे मोगऱ्याशी माझं नातं अधिकच घट्ट झालं. म्हणूनही असेल, पुढे माझं लग्न झाल्यावर नवऱ्याने आणून दिलेल्या, केळीच्या हिरव्यागार पानात गुंडाळलेला पांढऱ्याशुभ्र मोगऱ्याचा गजरा, एखाद्या दागिन्याइतकाच मौल्यवान वाटला होता.

असा हा मोगरा आयुष्याच्या प्रत्येक वळणावर कुठल्या ना कुठल्या रूपात भेटत गेला. कधी गजऱ्याच्या रूपात, कधी देवळातल्या अगरबत्तीत, कधी अत्तराच्या कुपीत तर कधी पावडरीच्या डब्यात! एखाद्या साध्या, सोज्वळ गृहिणीचा आंबाडा असो, मंदिरातल्या मूर्तीची पाऊले असोत, किंवा माडीवरील गाणं ऐकायला जाणाऱ्या एखाद्या रंगेल पुरुषाचं मनगट असो! मोगऱ्याला कशाचं सोयरसुतक नाही. ठिकाण कुठलेही असो! आपल्या सुगंधाने वातावरण निर्मितीची कामगिरी तो चोख पार पाडणार! खरा कर्मयोगी!

मोगऱ्याला इतर फुलांप्रमाणे रंग रूपाचं वरदान मिळाले नाही. शुभ्र सात्विक रंग आणि गोलाकार पाकळ्यांची रचना! पण सुवास असा कि राजापासून रंकापर्यंत साऱ्यांच्या मनावर याचं राज्य! असं म्हणतात कि श्रीकृष्ण वैकुंठाला परत गेला तेव्हा साऱ्या फुलांमधील गंध काढून आपल्यासोबत घेऊन गेला. गंध काढून घेतलेली फुलेही इतकी सुवासिक असू शकतात तर मग श्रीकृष्णाने नेलाच नसता गंध काढून तर?

तिथे भारतात आपल्या सुगंधाने आपल्या अस्तित्वाची दवंडी दूरवर पिटणारा मोगरा इथे अमेरिकेत मात्र आपला गंध चोरून बसल्यासारखा वाटतो. फुलं अगदी नाकाजवळ घेऊन हुंगावी लागतात. भारतीय मातीत पोसलेल्या मोगऱ्याची कुपी अन कुपी सुगंधाने ओसंडून वाहत असते. इथली माती फुलांचे बहुदा ते लाड करीत नसावी म्हणून कि काय इथली फुलं सुगंध जरा जपूनच पसरवतात. सुवासाची उधळा माधळ इथे नाही.

आमच्या नवीन घराच्या गृहप्रवेशाच्या वेळी एका काकूंनी भेट म्हणून मोगऱ्याचे रोपटे दिले. मी कोण हरखून गेले. मागच्या वसंतात ते रोपटं चांगलंच तरारून आलं. ' फुले वेचिता बहरू कळियासी आला' या अवस्थेला पोहोचलेलं. ते रोपटं फुलांनी अगदी बहरुन गेलं. माझ्या सात वर्षांच्या लेकीनं ओंजळभर फुलं गोळा करून आणली आणि माझ्यासमोर धरली. मी तिला विचारलं "काय करूया याचं?" तर म्हणाली "आई, मला याचा गजरा बनवून दे." मी चमकून तिच्याकडे पाहिलं आणि स्वतःशीच हसत म्हणाले 'चला म्हणजे वळणावरचे पाणी वळणावर गेलं म्हणायचं!' सुई दोरा घेऊन मी मोगऱ्याचा गजरा बनवायला घेतला आणि मनोमन त्या काकूंचे आभार मानले. गेली अनेक वर्षे माझ्या आयुष्यातील अनेक क्षण सुगंधित करणारा मोगरा आज माझ्या लेकीच्या मनातही फुलला होता.

**- जान्हवी केंडे**
**टॅम्पा, फ्लोरिडा**

# भटके पक्षी




## या देवी सर्व भूतेषु ..... ।



विमान प्रवासानंतर मेंदूत होणाऱ्या वेळसंकेताचे गोंधळ (म्हणजे जेट lag म्हणायचं आहे बरं का!) पहाटेचे ब्राह्ममुहूर्त जागर घडवतात. एके वर्षी अशा वेळी वाटलं होत की "कन्याकुमारीला जावं" त्या उत्कट ओढीनं मी सगळ्यांना ओढतच कन्याकुमारीला घेऊन गेले होते. देवीदर्शनाचे असे आणखी काही प्रसंग.

एकदा आमच्या सासरच्या कुलदेवतेच्या म्हणजे शांतादुर्गेच्या दर्शनाला - तिथे बकुळीची माळ घेतली, ती देवीऐवजी मी माझ्याच गळ्यात घातली होती. "आपणंच नाही का देवीरूप? मातृरूप?" असा तो एक सुवासिक साक्षत्कारी अनुभव होता.

मग एकदा हिमाचल प्रदेशात एका 'जागृत' देवीच्या दर्शनासाठी आम्हाला आमचा वाहन सारथी (ड्रायव्हर) ओढत घेऊन गेला आणि तिथलं ते गलिच्छ वातावरण, तेल, अन्न, निर्माल्य यांचा एकत्रित असा भयानक कुजका वास, चिखल, सांडपाणी आणि त्यातच उभी असलेली हळदी कुंकवाची दाटीवाटी दुकानं. मला उन्मळून आलं होत. मी दर्शन न घेताच माघारी फिरले. आणि तेव्हापासून बकुळ सुगंधाच्या आठवणीवर माझं देवी दर्शन आणि आत्मरूप दर्शन चालू असतं.

त्यामुळे यावेळी ऐन उन्हाळ्यात आंबाजोगाईला जाऊन आपल्या माहेरच्या कुलदेवतेचं दर्शन घेण्याच्या कल्पनेला मी थंड प्रतिसाद दिला. तरी कौटुंबिक सहल म्हणून आम्ही निघालोच. अंबाजोगाईला पोहोचलो, तेव्हा संध्याकाळ उलटून गेली होती. पण एकदा दर्शन घ्यावं आणि दुसऱ्या दिवशीची ओटीची तयारी करावी म्हणून कुटुंब निघालं योगेश्वरीला!

महाद्वार रस्त्यावरच तेच गलिछ दर्शन - उघडी गटार, कुत्री, डुकरं, कुचक्या कचऱ्याचे ढीग नि काय काय. इथे रोज हजारो भक्त येतात, त्यातल्या एकालाही नाही वाटत की आपण एक झाडू मारून देवीची सेवा करावी? सुवर्ण मंदिरात प्रत्येक भक्त कार सेवा करतो. आपण का नाही? मनात आणि पोटात उन्मळल पुन्हा. मंदिराचं आवार त्या मानाने बऱ्यापैकी स्वछ होतं. त्यामुळे दर्शनाला जायचं धाडस केलं. गाभाऱ्याचं अत्यंत ठेंगणं दार - तीनदा डोकं आपटलं. आत देवीस्वरूप पण का कोण जाणे कन्याकुमारीच्या दर्शनाला जी उत्कट भावना मनात दाटली, ती ओढ वाटेना. सवयीने डोकं टेकवलं. पण भाव मनी दाटेना!

गुरुजी प्रसाद देत होते. मी हात पुढे केला पण तेवढ्यात मागचा माणूस घुसला. माझ्या हाती प्रसाद न पडताच मी ढकलले गेले. बहुधा देवीलाही माझ्याबद्दल काही वाटलं नसावं. या कोंदट गाभाऱ्यात जेव्हा खूप गर्दी लोटते तेव्हा कार्बन मोनाक्सईडनं माणसं मरणार तर नाहीत ना या विचारानं मी पहाणी केली तेव्हा एक बाजू पूर्ण उघडी केलेली दिसली. हुश्श म्हटले. "भगवान के द्वारमे कमसे कम प्राणवायू पुरवठा है!" एका तरी भक्ताने विचार केला आहे.

बाहेर ते ओटीचे बोलणं चाललं होत. गुरुजी म्हणाले "योगेश्वरी तुमची माहेरची कुळदेवता ना? मग आता तुमचा तिच्याशी संबंध नाही. आता तुमची देवता तुमच्या सासरची." आईच्या मांडीवर लडिवाळपणे बसायला यावं आणि कुणीतरी खसकन ओढून जमिनीवर ढकलावं तस मला वाटलं. माझं नाव बदललं म्हणजे हिचं माझं नातं तुटलं? असंच तुटतं का माहेर?

"मी उद्या अभिषेक करणार नाही" असं जाहीर करून मी मागच्या बाजूला प्रसादाच्या साड्यांची दुकानं शोधत गेले. एक दोन प्रसादाच्या साड्या घेऊन दोन गरीब बायकांना द्याव्यात असा उद्देश होता. तिथे खोलीभर साड्यांचे गठ्ठे अस्ताव्यस्त पडलेले. इतक्या भक्तिभावाने लोकांनी देवीला अर्पण केलेल्या त्या साड्यांचा आणि भक्तांच्या भावनेचा तो अपमान पाहून माझं मन विटलं! मी तत्क्षणी बाहेर पडले.

आवार ऐसपैस. छानशी दीपमाळ. इथे सगळं देवीचं राज्य. बिचाऱ्या कालभैरवाचं उपेक्षित देऊळ बाहेर कोपऱ्यात. मग दुसऱ्या दिवशी पहाटे सात वाजता मंदिरात गर्दी नव्हती. खण नारळ तबकात ठेवला. त्याखाली दक्षिणेची नोट सरकवल्यावरंच गुरुजींनी आशीर्वाद दिला. मन प्रसन्न झालं. तबकातल्या हिरव्या बांगड्या, हळदी कुंकू सगळं बघता बघता मला भरून आलं. "आलीस गो बाय!" ती म्हणाली. मी मग डोकं टेकवलं. "भेटलीस ग बये!" मी तिला मनोमन म्हणाले.

आमचं ‘कनेक्ट’ झालं. ‘ये हृदयीचं ते हृदयी’ असंच वाटलं होतं नाही, कन्याकुमारी भेटली तेव्हा? पहाटे चारची वेळ. काकड आरतीच्या प्रकाशात चमकणारा तिच्या चमकीतला हिरा, तिचे शांत डोळे, माझ्यावर मातृत्वाची पखरण करणारे! आमच्या भेटीची ओढ तृप्त झाली तेव्हाही, तशी आताही. बाहेर एक जोगतीण भीक मागत बसली होती. तिला मी ओटीचा प्रसाद नारळ देऊन टाकला. कोपऱ्यातल्या उपेक्षित कालभैरवाचे दर्शन घेऊन परत निवासस्थानी आले.

कुटुंब गाडी निघाली पुण्याला. मी मात्र एकटीच पायरीवर प्रसाददादाची वाट पहात होते. आंबाजोगाईच्या भागात भटक्या मजुरांची आणि तांड्यांची पाल असतात. तिथं मुलांना शिकवण्याचं आणि वस्तीत लोकांना मदत करण्याचं काम ज्ञान प्रबोधिनीतर्फे प्रसाद करत असतो. कोविड संचारबंदीच्या काळात हे लोक उपाशी रहात होते. तेव्हा त्यांना शिधा पुरवण्याचं मोठं काम झालं होतं. ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन तर्फे आम्ही निधी जमवला होता. मुलं आईबापांबरोबर अशीच भटकत असतात. त्यांना शिक्षण देणं हे जिकिरीचं काम असतं. एका जागी स्वस्थ बसण्यापासून तयारी करावी लागते. त्यांना एका जागी बसण्याची गोडी लागावी म्हणून अमेरिकेतून काही मित्रांनी बॅग भरून खेळणी आणली. त्यांच्या आवडीमुळे मुले येतात. जमतात. मग अक्षर ओळख करून द्यायची. अशी ही वेगळी शाळा. कोणत्याही शिक्षण पद्धतीच्या साच्यात बसू शकतंच नाही. पण ही मुलं नाही शिकली तर उद्या रस्त्यावर गुंडगिरी करत मोकाट फिरतील. प्रश्न बिकट आहेत.

माझ्याबरोबर एक स्वयंसेवक देऊन प्रसादने माझी पाठवणी या वस्त्यांवर केली. वाटेत मुलांसाठी खाऊ म्हणून चिक्कू घेतले. मराठवाड्यातलं रणरणत ऊन. टोपी घालून मुलांना उगाच वेगळं वाटेल म्हणून मी डोईवर पदर घेतला. भराभरा पोरं, आया, म्हाताऱ्या गोळा झाल्या. “दादा काय आणलं” म्हणत पोरं नाचू लागली. “ताई कुठल्या तुमी” म्हणत माझ्याशी बोलू लागली. चिक्कू दिले. एका मुलीन मला स्वतः काढलेली सुंदर चित्र दाखवली. प्रसाद दादाने दिलेल्या पेन्सिली आणि कागद वापरून काढली होती. कोविडबंदीमध्ये खायला मिळायचं नाही तेव्हा भूक विसरण्यासाठी ती चित्र काढू लागली. अशा एकेक करुण कहाण्या. एकदम उन्हाचा चटका बसल्यागत झालं! मला गलबलून आलं. सगळ्या म्हाताऱ्या शिधा पाठवला म्हणून मला दुवा देत होत्या. एका म्हातारीनं कृतज्ञता म्हणून मला आपल्यातल्या अर्धा चिक्कू दिला आणि पुन्हा मला गहिवरून आलं. “हीच का ती योगेश्वरी?” “आलीस बाय” म्हणून मला पोटाशी घेणारी? उपाशी असताना मला अर्धा चिक्कू देणारी? काल देवळात प्रसाद मिळाला नाही म्हणून मी हिरमुसले होते. आज मला त्या अर्ध्या चिक्कूच्या प्रसादाने केवढा आनंद झाला!

आत कुठेतरी ‘मी तू पणाची झाली बोळवण’!
त्या ‘मातृरुपेंण संस्थिता’ देवीला मी मनोमन नमस्कार केला.

**- विद्या हर्डीकर सप्रे,**
**कॅलिफोर्निया**

## दृष्टी जशी

माझ्या वहीला पानं नाहीत
लिहिलेले आहे, पण पानं नाहीत
हे कसे शक्य आहे?
कुणी म्हणतं- “हे काल्पनिक
कोणी म्हणतो वेडा, कुणी डिजिटल”
पण हे मात्र खरे की
या वहीवर लिहिलेले आहे!

आता प्रश्न असा आहे
ही वही कोण वाचू शकेल!
वाचायला तर AI (Artificial intelligence) चे डोळे
लागतील
नाही तर कुणी तरी ही वही
पानं नाहीत म्हणून फेकून देतील

सांगायचं तात्पर्य
जगात सगळं लिहिलेल असतं
पण ज्याची दृष्टी जशी
तसं त्याला दिसतं
काहींना जसं सांगून समजत नाही
आणि काहींना न सांगता समजतं

**- राजन (निरंजन)**

**BMM पौरोहित्य**
तिसरा वर्ग लवकरच चालू होत आहे !
त्वरित नोंदणी इथे करा
https://bmm2.page.link/paurohitya

## एकलव्य फाउंडेशन

मानसिक आजारी व्यक्तींसाठी निस्पृहपणे काम करणारे एकलव्य फाउंडेशन

भारतामध्ये आजही मानसिक आजारांविषयी खूप मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष आणि कलंक भावना आहे. या सगळ्या परिस्थितीत रुग्ण आणि कुटुंबीयांचे अतोनात नुकसान होते. रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत, त्यांचा आजार बळावतो, स्वतःला देखील कशी मदत करायची याचे ज्ञान त्यांना अवगत होत नाही आणि कलंकपणाच्या भावनेत ते जगत राहतात. कुटुंबीयांची अवस्था याहून काही वेगळी नसते.

खरं पाहता मानसिक आजारांचे प्रमाण सर्वत्र खूपच मोठे आहे. एकूण लोकसंख्येपैकी दहा ते पंधरा टक्के लोकसंख्येला सामान्य किंवा तीव्र मानसिक आजार असू शकतो. मात्र इतर शारीरिक आजारांप्रमाणे मानसिक आजारी व्यक्ती आणि तिचे कुटुंबीय यांना समाजाकडून आवश्यक असणारा आधार, माहिती आणि मार्गदर्शन मिळत नाही.

ही परिस्थिती बदलण्याकरता सुमारे २५ वर्षांपूर्वी 'एकलव्य स्वमदत गट' मुख्यतः रुग्ण आणि कुटुंबीयांनी पुण्यामध्ये स्थापन केला. पुण्यामधील या गटाचा फायदा अनेकांना झाला आणि होत आहे. या क्षेत्रातील इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर पुण्यातील काम महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये पसरावे या दिशेने एकलव्य फाउंडेशनचे प्रयत्न आहेत. स्वमदत गटाबरोबरच रुग्ण व कुटुंबीयांना सहाय्यभूत ठरणारे आणि समाजाचा दृष्टिकोन बदलण्यासाठी मदत करणारे विविध उपक्रम एकलव्य मॉडेलच्या माध्यमाद्वारे चालू व्हावेत ही फाउंडेशनची इच्छा आहे.

एकलव्य फाउंडेशन चे काम हे मानसिक आरोग्य तज्ज्ञांकडून पुरवल्या जाणाऱ्या सेवांना पर्यायी नसून पूरक असे आहे. मानसिक आजार आणि आरोग्य विषयक गरजेचा आवाका लक्षात घेता, सर्वसामान्य नागरीक किंवा कम्युनिटीचा सहभाग, मानसिक आरोग्य सेवांच्या नियोजनामध्ये महत्वाचा असावा, असे जागतिक आरोग्य संघटनेने सांगितले आहे. त्याच तत्वाला अनुसरून एकलव्य फाउंडेशनच्या कार्यकारणी मंडळामध्ये तज्ज्ञ कोणीही नसून सर्व कार्यकारणी सदस्य बरे झालेले रुग्ण, त्यांचे कुटुंबीय किंवा स्वयंसेवक यातून आलेले आहेत. कार्यकारणीचे सर्व सदस्य केवळ स्वयंसेवक म्हणून या कार्यात सहभागी झाले आहेत.

संस्थेच्या कार्यकर्त्यांनी विविध उपक्रमांची तसेच प्रकाशनांची आखणी आणि नियोजन केलेले आहे. हे सर्व उपक्रम महाराष्ट्रातील विविध शहरातील रुग्ण व कुटुंबीयांपर्यंत पोहोचवायचे असतील तर त्यासाठी मोठ्या प्रमाणात या उपक्रमात भाग घेऊ इच्छिणारे स्वयंसेवक आणि आर्थिक सहाय्य याची आवश्यकता आहे.

अमेरिकेतील मराठी बांधवांसाठी इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेतून चालणारा स्वमदत आधार गट संस्थेला गरजेप्रमाणे चालू करता येईल. त्याचप्रमाणे अमेरिकेत विखुरलेल्या मराठी बांधवांना त्यांच्या मूळ गावी एकलव्य फाउंडेशनचे काम उभे राहावे अशी इच्छा असेल आणि त्याबाबतीत स्वतः किंवा मूळ शहरातील नातेवाईकांच्या सहाय्याने पुढाकार घेण्याची इच्छा असेल तर त्याचे देखील एकलव्य गटाकडून स्वागतच आहे. त्यासाठी लागणारी सर्व तांत्रिक माहिती आणि आधार एकलव्य फाउंडेशन कडून मिळू शकेल.

माहिती तंत्रज्ञानाचे मानसिक आरोग्य संबंधीच्या या क्षेत्रात देखील खूप मोठे महत्त्व आहे. त्या दृष्टिकोनातून देखील जर कोणाला आठवड्यातील काही काळ संस्थेच्या कामासाठी द्यावयाची इच्छा असेल तर त्यांचे स्वागतच आहे.




अनिल वर्तक (Ph.D)
अध्यक्ष, एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ, पुणे.
https://www.eklavyamh.org/
eklavyafoundationmh@gmail.com
WhatsApp: +91 9503710859


## बघता गाणी बॉलिवूडची, शंका अमेरिका-बॉर्न मुलीची




**- विनीता वेल्हाळ आणि गौतम पंगू**

# टेक्सस प्रादेशिक क्रिकेट स्पर्धा



गेल्या महिन्यात ह्युस्टन मध्ये बृहन महाराष्ट्र मंडळा ची "टेक्सस प्रादेशिक क्रिकेट स्पर्धा" पार पडली.

या स्पर्धेत आठ संघांनी भाग घेतला होता - सहा पुरुषांचे संघ, तर दोन महिलांचे संघ! ऑस्टिन मधून पुरुषांचे दोन तर महिलांचा एक, तसेच सॅन अँटोनीओ मधून पुरुषांचे दोन तर महिलांचा एक, आणि ह्युस्टन मधून पुरुषांचे दोन संघ या स्पर्धेसाठी उतरले होते. तीन मंडळांचे मिळून एकूण १२० खेळाडू या स्पर्धेसाठी एकत्र जमले.

'Community Outreach' या खात्याअंतर्गत क्रिकेट स्पर्धांचे आयोजन होत आहे. मंडळांची सदस्य संख्या वाढावी यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन 'Community Outreach' तर्फे केले जाते. बृहन महाराष्ट्र मंडळ समितीतर्फे हे खाते मी बघत आहे. गेल्या वर्षी या स्पर्धेच्या आयोजनाबद्दलची कल्पना मी आमच्या समितीकडे मांडली - अध्यक्ष संदीप दीक्षित आणि आमच्या समितीतील सर्व सदस्यांनी ही कल्पना त्वरित मंजूर केली.

त्यानंतर लगेचच या स्पर्धांचे आयोजन सुरु झाले. सर्वप्रथम प्रत्येक मंडळातून दोन ते तीन जणांनी पुढाकार घेऊन नेतृत्व केले. या सर्वांची एक 'क्रिकेट समिती' स्थापन झाली. या समितीकडून स्पर्धेचे नियम ठरवण्यात आले. क्रिकेट कार्यक्रमाच्या नियोजनाची धुरा सचिन कापसे यांनी सांभाळली आहे.

त्यानंतर प्रत्येक मंडळाने आपापल्या मंडळात "मंडळ विजेतेपद" स्पर्धा घेतली. विजेतेपद व उपविजेते पद मिळवलेले प्रत्येक मंडळातील दोन संघ प्रादेशिक सामन्यांसाठी ह्युस्टन ला दाखल झाले. या स्पर्धेसाठी सर्व संघांनी खास टी-शर्ट छापून घेतले त्या टी-शर्ट वर आपापल्या मंडळाचा लोगो तसेच बृहन महाराष्ट्र मंडळाचा लोगो ही छापण्यात आला.

प्रादेशिक सामन्यांच्या उद्घाटनासाठी बृहन महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष संदीप दीक्षित यांनी खास उपस्थिती नोंदवली. सचिन कापसे यांनी संदीप दीक्षित यांना गोलंदाजी करून या स्पर्धेची सुरुवात झाली.

महिलांचे दोनच संघ असल्यामुळे त्यांना तीन सामने खेळायचे होते. ऑस्टिनच्या महिला संघाने दोन सामने जिंकून सॅन अँटोनीओच्या संघावर विजय नोंदविला आणि महिला विजेतेपदाचा करंडक उचलला.

पुरुषांचे सहा संघ असल्यामुळे ही स्पर्धा दोन दिवसाची होती त्यातील पहिल्या दिवसाचे साखळी सामने अत्यंत चुरशीने पार पडले, मात्र दुसऱ्या दिवशी पहिला साखळी सामना झाल्यानंतर पावसामुळे व्यत्यय आला. आता हे सामने १९ ऑगस्ट २०२३ रोजी होणार आहेत. त्यामुळे पुरुषांच्या स्पर्धेतील विजेतेपदाचा करंडक कोण उचलतो हे बघण्यासाठी आपल्याला अजून काही दिवस थांबावे लागणार आहे.

स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व खेळाडूंचे, क्रिकेट समितीतील सर्व सदस्यांचे, तसेच प्रत्येक मंडळाला सहकार्य करणाऱ्या प्रायोजकांचा मी खूप खूप आभारी आहे.



याच पद्धतीचे सामने आता आगामी मैत्री मेळाव्यात पण खेळले जाणार आहेत - त्याबद्दलचा वृत्तांत ऑगस्ट महिन्यात आपल्याकडे येईलच.

- प्रसाद पानवळकर (ऑस्टिन)
(बृहन्महाराष्ट्र मंडळ समिती सदस्य)

**NAMASKAR** 🙏

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very
expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

## Join Donor List:

| | |
|---|---|
| JAGDISH & SHUBHANGI THAKUR | SWAROOP YOG & OTHER CHARITIES |
| RAVI & NILIMA BHIRUD | M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU |
| RAHUL & PUNAM MUTHA | ANAND RISHI Hosp. C T SCAN |
| KOTESWARA RAO KUNDA, MD | EDUCATIONAL FOUNDATION, A.P. |
| KIRAN& NNDINI JOAG | V.T. PATIL FOUNDATION |
| KISHOR DANDEKAR | AMPTE FOUNDATIO |
| SUBHASH & VASANTI PURANIK | CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST |
| SUHASINI JOSHI | KOSMIC BEATS |
| KAMLAKAR &ARUNA PENDSE | ATHASHREE |
| PRAMILA SARVA | ADHAR |
| VIJAY NARINGREKAR | EDUCTION |
| MUKUND & SHAILA DIDOLAKE | AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL |
| GOVIND & BHAKTI NADKARNI | SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA |
| | LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT |
| SHARAD PANJAPE | ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS |
| KAMALAKAR PENDSE | ATHASHREE |
| SUHASINI JOSHI | COSMIC BEATS |

बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

**Subscription Remittance Address:**
**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**


बृहन्महाराष्ट्र मंडळ



**नाते जुळते मनाशी मनाचे**




*Reshimgathee*

**A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America**

https://reshimgathee.bmmonline.org/




Five-level "Marathi Language Learning" progressive curriculum,
study guidelines, and
supporting materials
the BMM-Bharati Vidyapeeth's
joint certificates for
"Marathi Bhasha" examinations
after successful completion of
each level and passing criteria.
For BMM Marathi Shala Inquiries,
Email:- shala@bmmonline.org
https://bmmshala.net/

## लाट

अलगद जल झाले रे समुद्रात लाट
भर भर मग ती पाण्यात धावे अचाट
झप झप वर खाली हो तिचा खेळ हाच
खळ खळ हसणारे येत आवाज त्यात

उधळुनि तिन केला स्पर्श होता नभासी
खडक हि दिसले तेव्हा तिला रे किनारी
रवि किरण असे वाळू लख्ख रे चकाकी
कुतुहल तिज पाहोनी किनाऱ्यास वाटी

अवचित तिज आली ध्यानि गोष्ट ज्वलंत
खड़क दिसत जेथे तेथ माझाचि अंत
खळबळ मग जागे आत लाटेत संथ
सहजच अस आले दुःख आणीक खंत

गरजत मग येई नाद हा सागराचा
उगिचच तिज वाटे मी इथे संपले रे
बघ पण अस की ती लाट मीची असे रे
खर तर अविनाशी रे तिला जाण तू रे

**- शशांक**

## आकाश

दिसे रंगले लाल आकाश होते
कुणी पाहिले का खरे रंग त्याचे
कधी तांबडे रे कधी जांभळे हे
कुणाच्या न आभाळ राहे मुठी हे

धरा वाटते भेट आकाश घेते
कधी सागराला हि आकाश भेटे
कधी दूर रे टेकडी त्यास पेले
असे व्यापले विश्व होते नभाचे

जरी सर्व काही असे त्यात जागे
तरी हे कुणाच्या हतासी न लागे
जरी गंध वाहे सुधाचा हवेत
हवेचा स्वतःचा नसे वास येत

जयाला नसे रंग नाही सुगंध
अगम्यात राहे विना काहि बंध
चमत्कार झाले असे येथ खूप
नभाला दिले रे मनानी स्वरुप

**- शशांक**

# अनाकलनीय

रोजचा दिवस काय घेऊन उजाडेल सांगता येत नाही. सूर्योदय आणि सूर्यास्त जरी नेहमी प्रमाणे असला तरी या मधल्या कालावधीत काय दडलं असेल ते अनाकलनीयच. कालचाच किस्सा. काल ऑफीसला पोहोचलो आणि ऑफीसपासून काही मिनिटांच्या अंतरावर गोळीबार चालू असल्याचे अलर्ट आले. सवयीने आलेला अलर्ट पाहताच बंद केला आणि कामास लागलो. मेंदूने नक्की काय झालय याची दखलही घेतली नाही. तेव्हा समजलेच नाही नक्की काय घडतंय आणि हे आपल्या जवळपास घडतंय. नंतर त्याविषयी आणखी बातम्या येऊ लागल्या. चर्चा घडू लागल्या. मग मात्र भितीची लहर मनाला ग्रासू लागली.

तितक्यात आणखी एक गोळीबार झाल्याची बातमी धडकली. प्रियजनांचे फोन मेसेज येऊ लागले. तरीही एकीकडे आम्ही थंडच होतो. कारण सोपं होतं. जो पर्यंत आपलं काही जळत नाही तोपर्यंत हल्ली माणसे अशीच वागतात. नंतर हे वास्तव जाणवून बाहेर पडायचेही भय वाटू लागले, पण घरी जाणं तर भाग होतं ना.

आता मात्र मनात विचारांचे थैमान माजले. काय चाललंय या जगात? का अशी वागतात माणसे? पिस्तुलाचा, रायफलचा शोध ही उत्क्रांती म्हणायची की अधोगती? त्या वरून जे राजकारण केले जाते ते का केले जाते? पैसाच सर्वश्रेष्ठ ठरतो का? माणसाच्या जीवाला काहीच किंमत नाही का ? काही वर्षांपूर्वी एका शाळेमधे झालेल्या गोळीबाराने व्यथित होऊन कविता लिहिली होती. त्याची आठवण झाली. आज इतकी वर्षे उलटली तरी परिस्थिती तीच!

तोच उद्रेक, तीच कृती, तेच निरपराध लोक मारले जाणे आणि तेव्हासारखेच षंढ आपण. जणू आपल्या अंगणात केर होत नाही तोपर्यंत स्वच्छता करण्याचं काहीच कारण नाही या थाटात वावरणारे.

क्षणभर मनात विचार चमकून गेला, आज त्या वेळी आपण रस्त्यावर असतो तर काय केलं असतं? कल्पनाच करू शकत नाही. बातम्या पाहताना जाणवलेला तो थरार आपण क्षणभर अनुभवतो आणि सोडून देतो. चार दोन दिवस त्याची चर्चा होते. बस. इतकंच.

इतकी बेफिकीर वृत्ती जनमानसात का बरं बोकाळते आहे? जो गुन्हा करतो त्याच्या मनाला आपण जे हातात बाळगतो आहोत ते घातक आहे, समोरून येणारा हाडामासाचा माणूस आहे, कोणाचा तरी कोणी लागतो आहे हे का नाही जाणवत? उलटपक्षी असेही जाणवते की ज्याने गोळीबार केला त्याच्या मनात नक्की काय चालू असेल? का इतका टोकाचा निर्णय घेतला असेल? इतकं काय खूपंत असेल की जे कोणाच्या लक्षात आलं नाही? की हा निव्वळ मूर्खपणा असू शकतो? असा मुर्खपणा जो इतरांना जिव्हारी लागेल? स्वतःचं आयुष्य पणाला लावून असं वागण्याची काय बरं ही जीवघेणी तऱ्हा?

लोकांना कदाचित् सतत मुखवटा घालून वावरणं एका कालावधीनंतर सहन होत नसावं. त्याचा उद्रेक मग असा नको तिथे होतअसावा का? की स्वतः पलिकडे काहीही न बघणारी माणसे वाढत आहेत? स्वतःतच इतकी गुरफटली आहेत की सहृदयताच संपुष्टात यावी? संवेदना, सहवेदना हे शब्दच पोकळ झाल्यासारखे वाटतात.

समाजात काही अघटीत घडलं की तात्पूरते आपण अलर्ट मोड मधे जातो. मग चार दिवस जातात आणि ही गोष्ट मागे पडते. वाहिन्यांवर बातम्या झळकतात. खरं तर बातमी कोणतीही असो चघळायला विषय मिळाल्याचं समाधान प्रत्येक वाहिनीला असतं. व्हॉटसॲप, इन्स्टाला चर्चा होतात, मत मतांतरे होतात आणि एक दिवस फुग्यातली हवा जाऊन विषय सावकाश जमिनीवर येऊन बसतो.

या साऱ्यात जर कोणाला त्रास होत असेल तर नाहक मारले गेलेल्यांचे नातेवाईक आणि जवळची माणसे यांना. तिकडे कदाचित कोणाचेच लक्ष नसते.

मला नेहमी असं वाटतं की मनाची बैठक सुदृढ असेल तर असे गुन्हे कमी होतील का? अर्थात ही फक्त एक शक्यता आहे. मनात सतत नितीमत्तेची बोच असेल तर कदाचित असं कृत्य हातून घडणार नाही.

मीडियाचा झालेला प्रक्षोभ आणि नको असलेल्या अनेक गोष्टी ज्या कानावर सतत आदळत असतात, इच्छा असो वा नसो. शिवाय लहानपणापासून जे अनेकानेक व्हीडीओ गेम्स मुले खेळतात यातून हे सर्व हाताळण्याची भीती, मर्यादा मनातून पुसूनच जात असेल का? किंवा असही वाटतं की खेळ आणि वास्तव यातली सीमारेषाच धुसर होते कदाचित. तिथे गोळ्या मारायची सवय होते आणि वास्तवाचे भान हरपते की काय?

कोणा एकाची मानसिक व्यथा, अशांती, अस्थिरता इतकी बळावी की त्याने इतरांचा जीव घ्यावा? हे कितपत येग्य आहे? सहानुभूती कोणाला द्यायची हेच कठिण आहे. सरतेशेवटी इतकेच म्हणावेसे वाटते की कोण कोणता हिशेब कशाप्रकारे चुकता करण्यास येथे येतो ते परमेश्वरच जाणे. आपल्या हातात फक्त आपले कर्म चांगले ठेवणे इतकेच आहे.

**©शिल्पा कुलकर्णी**
**लुईव्हील, केंटकी**

## Oregon Marathi Mandal (OMM)

### 30th year Anniversary

This BMM brochure takes us back to 1993 and has a historical significance. When Anjali and I saw this in late 1992, there was no Marathi Mandal in Portland. There were a few Marathi families who used to get together for Ganapati Festival. When we saw the brochure, Anjali and I decided to take the advantage since Arun Date was already going to be in the USA. There were very few Indians let alone any Maharashtrians in town, and not a single Indian store. We were desperate to have a Marathi music program in Portland.

We had to negotiate the cost of the program. Even though BMM discounted the program, it was still a large amount in 1993. We had no clue about how many people would show up. Our daughter was barely five months old but we were desperate to do the program, the only other choice was to listen to the music on cassette tapes. There was no internet, or YouTube. But, when there is a will, there is always a way. Feeling lonely in a town with only few Indians or Marathis drove the decision.

But we didn't know how big the local population was and how much to charge/ticket and if tickets would cover the cost and the venue. So, I set in motion. First, I collected the white page phone directories from Portland, Beaverton, Tigard, Corvallis, Tri-city, Gresham, Hillsboro, and other nearby towns. Then, I went through every page of every directory and whenever we found any name that resembled a Maharashtrian, Gujarati, or North Indian, we got into two lists: Indians and Maharashtrians with their addresses and phone numbers in handwritten spreadsheet and the first directory of Marathi people in Portland was born. We fixed the program date and then we started calling everyone. We made sure that we could count on them. They were excited and showed their support. Marathi families who had American spouses also showed support by agreeing to buy tickets for the entire family. It was very encouraging.

Arun Date was not accompanied by Anuradha Paudwal, so we needed a female singer. One of residents: Nirmal Bajekal (disciple of Dr. Prabha Atre and since then has moved to Richmond, VA) joined as the female singer. Long time resident Shantu Shah helped us to secure a venue in Beaverton where he worked. Needless to say, the program was a success and we were thrilled to hear their sweet voices. Ajay and Sachin did an outstanding job on tabla and peti. We were mesmerized. Nirmal filled the space for Anuradha Paudwal beautifully.

We had the esteemed pleasure of hosting Mr. Arun Date, Ajay Dhongde, and Sachin Jambhekar at our home. We thoroughly enjoyed their company. Anjali and I somehow managed our 6 month baby throughout these tough times. Hands down, the first Marathi program in Portland was a success!

Later on Anjali and I, Arun Joshi, Shubha Joshi, and Bharti and Jayant Ingle, Sudhir and Medha Joshi and Subhash and Kanchan Phatak of Corvallis, laid down the foundation of OMM, formed a committee, and Sudhir Joshi put together the first draft of bylaws by studying and emulating similar ones from other mandals. The directory I made became the first OMM directory.

That was 30 years ago and this month is OMM's 30th anniversary in April. It started with Mr. Arun Date's program in a modest yet ambitious setting. Those days, Anjali who is a painter would hand draw every brochure, and I would write all the contents, print on a colored Tektronix printer, tri-fold it, handwrite each address, stick a stamp and mail it. It was the time where everyone worked together like a team with an ambition to start our OMM.

Looking back, I feel, we, the initial group of people who formed the OMM were the pioneers, the trailblazers, and visionaries with deep interest in preserving our culture, roots, customs, and Marathi language for the next generation. Since then, the seedling has grown into a tree in its own right and is doing well in the hands of the new generation.

© Sandhiprakash Bhide

**उत्तर अमेरिकेतील मराठी रसिकहो,**

उत्तर अमेरिकेत मराठी समाज मोठ्या संख्येने स्थायिक झाल्यापासून महाराष्ट्रातील अनेक गायक, नट, लेखक कार्यक्रम सादर करण्याच्या निमित्ताने अमेरिकेस भेट देत आहेत. सुरवातीला पु.ल.देशपांडे, सी. रामचंद्र, रमेश मंत्री, वसंत बापट, जितेंद्र अभिषेकी, सुहासिनी मुळगांवकर, सुधीर फडके असे अनेक प्रसिद्ध लोक अमेरिकेस येऊन येथील समाजास रिझवून गेले. सर्वांचे येथे जोरदार स्वागत झाले. गेली कांही वर्षे अशा प्रकारचे कार्यक्रम मुख्यतः स्थानिक मराठी मंडळातून होत आले. या कलाकारांना आणण्याची जबाबदारी मात्र त्यांचे मित्र, चाहते यांनी उचलली. त्यामुळे अशा दौऱ्याचे आयोजन व त्याला मिळणारा प्रतिसाद हा दौरा स्पॉन्सर करणाऱ्या व्यक्तीच्या क्षमतेवर अवलंबून असे.

लॉस एंजिलीस अधिवेशनानंतर आमच्या कार्यकारिणीने अनेक नवीन प्रकल्पांचा संकल्प केला. त्यामध्ये महाराष्ट्रातील कलाकारांचे दौरे आयोजित करण्यासाठी एक यंत्रणा निर्माण करण्याचे ठरवले होते. त्यासाठी लॉस एंजिलीसच्या सुभाष दामले यांची नेमणूक केली होती. श्री. दामले यांनी आत्तापर्यंत येऊन गेलेले कलाकार कोण, सध्या महाराष्ट्रात कोणते कलाकार गाजत आहेत, कुठल्या प्रकारचे कार्यक्रम उत्तर अमेरिकेतील मराठी लोकांना आवडतील याचा विचार केला व नोव्हेंबर ९२ मध्ये भारतात गेले असताना काही कलाकारांची भेट घेतली. त्यावरून चंद्रकांत काळे व माधुरी पुरंदरे (अमृतगाथा, प्रीतरंग), सुधीर मोघे (कविता पानोपानी), अरूण दाते (शुक्रतारा मंदवारा), श्रीकांत पारगांवकर-अनुराधा मराठे (सुगम संगीताचा कार्यक्रम) हे कार्यक्रम अमेरिकेतील बहुसंख्य मराठी लोकांना आवडतील व मराठी लोकांची वस्ती असलेल्या मोठ्या व छोट्या शहरातून करता येतील असे त्यांनी ठरवले. अमेरिकेत परत आल्यानंतर कांही मंडळांचा कलाकार निवडीबाबत सल्ला घेतला असताना अरूण दाते यांची बऱ्याच मंडळांनी निवड केली आणि दौऱ्याच्या आंखणीस सुरूवात झाली.

स्थानिक मराठी मंडळांच्या उत्तम सहकार्यामुळे सर्व प्रयत्नांची पूर्तता होऊन आपल्या शहरात हा कार्यक्रम सादर होत आहे याचा बृ. मंडळाच्या कार्यकारिणीस खूप आनंद होत आहे. आपणा सर्वांच्या भरघोस प्रतिसादामुळे उत्साहित होऊन सप्टेंबर ९३ मध्ये वर उल्लेखलेल्या इतर कार्यक्रमांपैकी एक कार्यक्रम येथे सादर करण्याच्या तयारीला सुभाष दामले लवकरच सुरूवात करतील. बृ. मंडळाच्या या प्रकल्पास आपण जसा उत्तम प्रतिसाद दिलात तसाच इतर प्रकल्पांना सुद्धा द्यावा अशी आमची विनंती आहे. उत्तर अमेरिकेतील मराठी समाज स्थानिक मराठी मंडळे व बृ. मंडळ यांच्या छत्राखाली एकत्र आला तर अनेक प्रकारचे अशक्य वाटणारे प्रकल्प यशस्वी करता येतील आणि त्याचा फायदा आपल्याला व तरूण पिढीला मिळेल असा मला विश्वास वाटतो.

सुभाष दामले यांनी घेतलेल्या परिश्रमांबद्दल मनःपूर्वक आभार !

**मोहन रानडे,** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका

# बृहन्महाराष्ट्रवृत्त

महाराष्ट्राचा नि आपला ऋणानुबंध जुना, गावाकडनं येणारी प्रत्येक गोष्ट त्या ऋणानुबंधाला जागवते. गावाकडल्या वार्ता दरमहा गेली १३ वर्षे आपल्या घरपोच करणारे एकच मराठी मासिक वृत्तपत्र

**संपादकः शीला पिंपळसकर**

महाराष्ट्र, उत्तर अमेरिका व इतर देशातील मराठी समाजाच्या बातम्या

आकर्षक सदरे, व्यक्ती परिचय, पुस्तक परिचय, यूथ फोरम, वैचारिक लेख


छोट्या व मोठ्या जाहिरातींसाठी उत्तम माध्यम

**वार्षिक वर्गणीः अमेरिका १५ डॉलर्स. कॅनडा १८ डॉलर्स**

**आजीव सदस्यत्वः अमेरिका २०० डॉलर्स, कॅनडा २५० डॉलर्स**

---

# नामदर्शिका



उत्तर अमेरिकेतील ४४०० मराठी कुटुंबांची यादी आपल्या संग्रही अवश्य हवी. तुमच्या स्थानिक मंडळांकडे ५ डॉलरला उपलब्ध आहे. पोस्टाने हवी असल्यास ७ डॉलरचा चेक पाठवा.

---

**बृ. वृत्त व नामदर्शिकेसाठी पत्रव्यवहाराचा पत्ताः**

BMM NEWSLETER
BOX 18154
PHILADELPHIA PA 19116-0154
TEL: (215)969-1232
24 HRS FAX: (215)677-2751




## ६ वे मराठी अधिवेशन, २,३,४ जुलै ९३

Baltimore Convention Center, Baltimore MD

आत्तापर्यंत सुमारे ४२०० लोकांनी नांवे नोंदवली असून एकूण उपस्थिती ५०००च्या घरांत जाईल असा अंदाज आहे.

श्रीमती विजया मेहताः प्रमुख पाहुण्या

उद्योजक प्रताप शिर्केः उद्घाटक

प्रमुख आकर्षणेः विनोदी नाट्य प्रवेश, पुस्तक पंढरी, सारजा हे नाटक, विविध विषयांवर परिसंवाद, संगीताचे कार्यक्रम, तरूणांनी बसविलेले खास कार्यक्रम, उद्योजकांचे विक्री कक्ष

प्रमुख संयोजकः मालिनी जोगळेकर, श्रीकृष्ण पंडितः (301)469-6723

नांवनोंदणीः रजनी जोगळेकरः (703) 573-6570

प्रसिद्धी व स्मरणिकाः दिलीप वि. चित्रेः (301)459-1836

---

लॉस एंजेलिस अधिवेशनांत गाजलेले एक धमाल लोकनाट्य आता बृहन्महाराष्ट्र मंडळ व्हिडिओवर सादर करीत आहे.



## दूर देशीचा वग
## अर्थात
## यांकी देशात किसन देव

लेखकः सुधीर आळेकर

दिग्दर्शकः मुकुंद मराठे

सादरकर्तेः बे एरिआ मराठी मंडळ

किंमतः १९.९९ अधिक २.५० शिपिंग

चेक पाठविण्याचा पत्ता.

BRIHAN MAHARASHTRA MANDAL
BOX 18154
PHILADELPHIA PA
19116-0154
(215)969-1232

## संपूर्ण कार्यक्रम

| | |
|---|---|
| शुक्रवार २६ मार्चः | **सिॲटल** |
| गुरूदास कोडे | (206)527-4632 |
| शनिवार २७ मार्चः | **लॉस एंजिलीस** |
| सुभाष दामले | (818)285-8768 |
| रविवार २८ मार्चः | **सॅन फ्रान्सिस्को** |
| ज्योती कानिटकर | (408)262-8398 |
| शुक्रवार २ एप्रिलः | **डलास-फोर्ट वर्थ** |
| सुभाष जोशी | (817)294-0352 |
| शनिवार ३ एप्रिलः | **ह्यूस्टन** |
| सरोज बडछापे | (713)995-1294 |
| रविवार ४ एप्रिलः | **ऑस्टिन** |
| जयराम नाडकर्णी | (512)244-1422 |
| शुक्रवार ९ एप्रिलः | **ॲटलांटा** |
| विजय देशपांडे | (404)469-8699 |
| शनिवार १० एप्रिलः | **ओरलॅन्डो** |
| प्रफुल्ल किर्तने | (407)774-9975 |
| रविवार ११ एप्रिलः | **मायामी** |
| रवी प्रधान | (407)483-7004 |
| शुक्रवार १६ एप्रिलः | **सेंट लुईस** |
| श्रीनिवास ठाणेदार | (314)644-2002 |
| शनिवार १७ एप्रिलः | **शिकागो** |
| सुभाष देवधर | (708)816-6439 |
| रविवार १८ एप्रिलः | **डेट्रॉईट** |
| मिलींद सोहनी | (313)454-4881 |
| शुक्रवार २३ एप्रिलः | **बफेलो** |
| दिलीप गोळे | (716)816-6439 |
| शनिवार २४ एप्रिलः | **टोरांटो** |
| मीना घाणेकर | (416)479-0313 |
| रविवार २५ एप्रिलः | **पिटस्बर्ग** |
| वसुधा धर्माधिकारी | (412)366-1979 |
| **शुक्रवार ३० एप्रिलः** | **इंडियानापोलिस** |
| **शिवाजी गुणले** | (317)849-3510 |
| **शनिवार १ मेः** | **सिनसिनाटी** |
| **शामल देसाई** | (513)671-1898 |
| **रविवार २ मेः** | **शार्लोट** |
| **प्रदीप टिपणीस** | (704)846-4951 |
| **शुक्रवार ७ मेः** | **विल्मिंग्टन** |
| **यशवंत विनोद** | (302)239-5672 |
| **शनिवार ८ मेः** | **फिलाडेल्फीया** |
| **मकरंद फडके** | (215)672-8273 |

**BRIHAN-MAHARASHTRA MANDAL**
**OF NORTH AMERICA**
**(Founded 1981)**

**FOUNDERS**
*Sharad Godbole, Vishnu Vaidya,*
*& Jayashree Huparikar, Chicago*

**PAST PRESIDENT (1987-1991)**
*Shriram Mulgund, Toronto*

**EXCECUTIVE COMMITTEE (1991-1993)**

**PRESIDENT**
*Mohan Ranade, Philadelphia, PA*
(215)969-1232

**SECRETARY**
*Vijayendra Pradhan, West Nyack, NY*
(914)623-3770

**TREASURER**
*Arun Londhe, Palo Alto, CA*
(415)494-0588

**MEMBERS**
*Avinash Kagade, Hazlet, NJ*
(908)888-0533
*Uma Dighe, Glenview, IL*
(708)680-2459
*Shalan Khandekar, Unionville, ON*
(416)940-0105
*Ram Badchape, Houston, TX*
(713)995-1294
*Anil Joglekar, Silver Spring, MD*
(301)989-0581

**BMM NEWSLETTER EDITOR**
*Sheela Pimplaskar, Philadelphia, PA*
(215)698-8259

**REPRESENTATIVES IN INDIA**
***Manohar Deodhar***
Makarand Society, Bldg 32,
Veer Savarkar Marg
Mahim, Bombay
400016
Tel: 452179

***Achyut Phadke***
9 A 'Chitra' 2nd Flr, Amrit Kumbh Society
Bhavani Shankar Rd
Dadar, Bombay 400028
Tel: 422-1207

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ
BRIHAN MAHARASHTRA MANDAL

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका**
**आणि**
**स्थानिक मराठी मंडळ**
**सहर्ष सादर करीत आहे**
**महाराष्ट्रातील लोकप्रिय भावगीत गायक**

# अरूण दाते

**यांचा सुगम संगीताचा कार्यक्रम**



**साथीदार**

**तबला** **हार्मोनियम**




**अजय धोंगडे** **सचिन जांभेकर**

**२६ मार्च ९३ ते ३१ मे ९३**